दिनांक २२/१०/२०२०

## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक संतोष रामदास पाटे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे सिटीचौक, औरंगाबाद शहर यांनी ५०,०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | संतोष रामदास पाटे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे सिटीचौक, औरंगाबाद शहर रा. पडेगाव, औरंगाबाद. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे सिटीचौक, औरंगाबाद शहर गु.र.न.५५४/२०२०, कलम ७ ला.प्र.का. १९८८. दि.२२/१०/२०२० |
| तपास अधिकारी | :- | श्री. संदीप राजपुत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ५०,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | पोलीस ठाणे सिटीचौक येथे दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये सहआरोपी न करुन, अटक न करण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | पोलीस ठाणे सिटीचौक चे पाठीमागील पार्किंग मध्ये |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांना पोलीस ठाणे सिटीचौक येथे दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये सहआरोपी न करुन, अटक न करण्यासाठी संतोष पाटे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे सिटीचौक, औरंगाबाद शहर हे ५०,०००/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, संतोष पाटे यांनी तक्रारदार यांच्याकडे ५०,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे दिनांक २१/१०/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, संतोष रामदास पाटे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे सिटीचौक, औरंगाबाद शहर यांनी वरील ठिकाणी तक्रारदार यांच्याकडुन ५०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक यांचे विरुद्ध पोलीस ठाणे सिटीचौक, औरंगाबाद शहर येथे वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल झालेला आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. संदीप राजपुत यांनी कारवाई केली आहे. त्यांना पोह गणेश पंडुरे, पोना गोपाल बरंडवाल, पोशि किशोर म्हस्के, केवल घुसिंगे यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :-** 1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

२२/१०/२०२०
**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग**
**औरंगाबाद.**